ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)
VOL. 7 | ISSUE 1 | FEBRUARY 2021

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on

## GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

(Book II)



**Chief Editor**

**Dr. R. S. Funne**

*(Principal)*

*Issue Editors*

**Dr.S.T.Samale | Dr.S.G.Rathod**

## अनुक्रमणिका


१. महिला सक्षमिकरण व शासनाच्या योजना
प्राचार्य डॉ. राम फुन्ने | ०८

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील स्त्रियांच्या दृष्टीकोणातून मांडलेला ....
चोपडे विनायक भगवानराव, / प्रा.डॉ.साहेब राठोड | १३

३. संत कवयित्रींच्या कवितेतून आलेले स्त्री जीवनाचे चित्रण
प्रा.डॉ.गणपती जोतीबा मोरे | १६

४. 'महिला सबलीकरण आणि सामाजिक संस्कृती यांच्या सहसबंधाचे अध्ययन'
प्रा.डॉ.मारोती मोतीराव बामणे | २०

५. लिंग समानता : महिलांचे आर्थिक सबलीकरण
डॉ.सुरेश सामाले | २४

६. भारतीय उच्च शिक्षणातील स्त्रियांचे स्थान
प्रा. गुरुदेव गांगुर्डे | ३०

७. महिला सक्षमिकरण ऐतिहासीक दृष्टीकोन
डॉ.हनुमान मुसळे | ३४

८. महिलांच्या बदलत्या राजकीय विकासात ७३ व्या घटनादुरुस्तीचे महत्व:
फुन्ने नारायण सखाराम | ४०

९. महिला सबलीकरणाकरिता स्वातंत्र्योत्तर काळात झालेले प्रयत्न एक आढावा
सचिन प्रकाशराव देशमुख / विश्वास दामोदर तळेकर | ४५

१०. वारकरी संप्रदायतील संत कवयित्रींचे योगदान
डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे | ४९

११. नोकरी करणाऱ्या महिलांच्या बदलत्या भूमिका आणि समस्या
प्रा.डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे | ५६

१२. महिला सक्षमीकरण आणि शासकिय धोरणे
प्रा.डॉ.विद्या खंडारे-गोवंदे | ६४

१३. फ. म. शहाजिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीचित्रण
प्रा. डिगोळे बालाजी विठ्ठलराव | ६९

१४. 'संत कवयित्रींच्या अभंगातून अभिव्यक्त झालेले महिला सशक्तीकरणाचे....
प्रा.गणेश शिवाजी मारेवाड | ७५

१५. ग्रामगीतेतील लिंगभाव : एक अभ्यास
प्रल्हाद दत्तराव भोपे | ८०

१६. भारतीय राजकारण आणि महिला
डॉ.हरी गंगाधर काळे | ८८

१७. स्वयंसहाय्यता बचत गटाचा इतिहास आणि ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण
प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | ९२







१८. महिला सक्षमिकरणात आरक्षणाची भूमिका
कचरे जी.एम./ डॉ.साहेब राठोड | ९७

१९. लिंगभेद: एक चिकित्सक अभ्यास
प्रा. काळे तुळशिदास फकिरजी | १०३

२०. महिला सबलीकरण: एक दृष्टिक्षेप
डॉ.खलील नबीसाब सय्यद | १०७

२१. भारतीय महिलांची स्थिती आणि गती
डॉ.लक्ष्मीकांत मारोतीराव जिरेवाड | ११२

२२. लिंगभाव असमानता व महिला सबलीकरण
प्रा. मधुकर ठोंबरे / प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण | ११२

२३. महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण
प्रा. हेमंत त्रिंबकराव शिंदे | १२१

२४. राजर्षी शाहू महाराजांचे महिला सबलीकरणासंबंधी विचार आणि कायदे
प्रा. डॉ. एस. बी. माने | १२५

२५. महिला सबलीकरण आणि सामाजिक संस्कृती
प्रा.डॉ.गजानन बाबुराव मरगीळ | १३०

२६. भारतामधील यशस्वी महिला उद्योजकाचे गुण व कार्य आणि भूमिका
डॉ. बालासाहेब शिवाजी पवार | १३३

२७. हिंदू कोड बिल : स्त्री-पुरुष समतेचा मानवतावादी प्रकल्प
प्रा.डॉ.आनंद इंजेगावकर | १३८

२८. पंचायतव्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग आणि महिला सबलीकरण
डॉ. बी.व्ही. डोंगरे | १४१

२९. ७३वी घटनादुरुस्ती आणि महिलांचा राजकीय सहभाग
डॉ. शारदा राजेंद्र पवार | १४६

३०. ग्रामीण महीलांच्या सक्षमीकरणामध्ये अशासकीय संस्थाची भुमिका ...
कु. प्रतिभा सुभाषराव काटकर | १४९

३१. स्थानिक स्वराज्य संस्थातील महिला आरक्षण व ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण
प्रा.यादव कल्याण दत्तात्रय | १५८

३२. उच्च शिक्षणात आदिवासी आंध स्त्रीचे योगदान
प्रा.सुनील मिरासे | १६५

३३. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री जीवन
प्रा.डॉ. श्रीहरी चव्हाण | १७०

३४. महिला सशक्तिकरण आणि महिला बचत गट
प्रा. सुनिता जगन्नाथराव कुकडे | १७४

३५. महिला सबलीकरणात पुरूषांचे योगदान / डॉ.साईनाथ बनसोडे | १७९

Late Ramesh Warpudkar College Sonpeth

11.

# नोकरी करणाऱ्या महिलांच्या बदलत्या भूमिका आणि समस्या

**प्रा.डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कै रमेश वरपुडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनपेठ,जि. परभणी

स्त्रीमुक्ती, स्त्री-पुरुष समानता आणि स्त्री शक्ती या संकल्पना एकविसाव्या शतकात नव्या नाहीत तर त्या बऱ्याच अंशी समाजात रुजलेल्या आहेत. शहरी सुशिक्षित वर्गात व ग्रामीण भागातही स्त्री संघटना,महिला आघाडी, स्त्री आधार केंद्र, स्त्री मुक्ती चळवळ, स्त्रियांच्या स्वयंसेवी संस्था, स्वयंसहाय्यता समुह आणि स्त्रियांसाठी आरक्षण हे विषय परिचयाचे झालेले आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केल्यामुळे स्त्री प्रश्नांची जाणीव वाढलेले आढळून येते, त्याबरोबरच या संदर्भातील विविध संकल्पनांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला दिसून येतो, तसेच आज कोणतेही विकासात्मक आर्थिक धोरण, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर असो त्याचा जात, वर्ग, लिंगभाव यावर नेमका काय परिणाम होणार आहे हे तपासून त्या धोरणावर चर्चा पूर्ण होते व त्याचा स्वीकार केला जातो. म्हणून आज स्त्री मुक्ती, स्त्री शक्ती, स्त्री पुरुष समानतेची चळवळ अर्थकारण, समाजकारण, राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे.

महिलांच्या बाबतीत विश्वव्यापी काही स्वरूपाची समान प्रश्न असल्यामुळे जागतिक स्तरावर स्त्रियांच्या प्रश्नांची स्वतंत्र नोंद घेतली जात असून हीच गोष्ट ध्यानात घेऊन अमेरिकेतील महिलांनी पुढाकार घेऊन जागतिक स्तरावर व्यासपीठ तयार केले. १९७५ हे वर्ष महिला वर्ष म्हणून घोषित करन्यात आले. १९७५ ते १९८५ हे दशक स्त्री म्हणून दाखविले गेले. या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर तसेच अनेक देशांतून स्त्रीवादी दृष्टीने स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यास सुरुवात झाली. स्त्रियांवरील अन्याय, स्त्री-पुरुषातील विषमता दूर व्हावी महिलांच्या विकासासाठी प्रयत्न व्हावेत या दृष्टीने वेगवेगळे चळवळी आंदोलने सुरू झाली.

भारतीय समाजातील स्त्रियांच्या जीवनात वस्तीत परिवर्तन करू पाहणाऱ्या सुधारकांना व समाजातील अनेक गटांचा व उच्च जातीतील व्यक्तींच्या विरोधाचा सामना करावा लागला होता. सुधारकांची अनेक प्रकारे अवहेलना केली गेली परंतु अथक व कठोर परिश्रमानंतर काळाने सुधारकांच्या बाजूने निर्णय दिला.





भारतीय घटना निर्मिती कारांनी स्त्री-पुरुषांमधील भेद दूर करण्यासाठी स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे विविध हक्क व अधिकार प्रदान केले. स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराला आळा घालण्यासाठी कायद्यात अनेक सुधारणा केल्या यासाठी काही नवीन कायदे निर्माण करण्यात आले. प्रारंभीच्या काळात केवळ शिक्षण क्षेत्रात दिसणाऱ्या महिला कला, साहित्य, संशोधन, राजकारण इत्यादी क्षेत्रात आहेत. अंतराळात प्रवेश करणाऱ्या महिलांमध्ये भारतीय वंशाच्या कल्पना चावला, सुनीता विल्यम्स यांनी यशस्वी कामगिरी केली. नवीन क्षेत्रात यशस्वी कामगिरी करणाऱ्या, सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देणाऱ्या जुन्या पिढीतील स्त्रियांचा आदर्श समोर ठेवून मोठ्या धडाडीने काम करत आहेत.

**शोधनिबंधाचा उद्देश:**

१. नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या जाणून घेणे

२. नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या वर उपाययोजना सुचवणे

**गृहीतकृत्य** - आजही नोकरी करणाऱ्या महिलांना कौटुंबिक व कार्यालयीन जबाबदाऱ्या सांभाळताना ताणतणावाचं सामना करावा लागतो

**संशोधन पद्धती** - प्रस्तुत शोधनिबंधा साठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा आधार घेण्यात आलेला आहे, व शोधनिबंधाचे उद्देश समोर ठेवून सामग्रीचे संकलन करण्यात आले आहे. विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून शोध विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

शासनाने महिलांना आरक्षण उपलब्ध करून दिले आहेत. या आरक्षणाच्या आधारे विविध स्तरावर नोकरी करणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. विविध कार्यालयात महिला विविध पदे भूषवत आहे. नोकरीच्या निमित्ताने महिला घर सोडून स्वतःचे वेगळे अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न करत आहे, पण त्यांचे कार्यक्षेत्र जेव्हा मर्यादित होते, केवळ गृहिणी म्हणूनजेव्हा ती फक्त घर सांभाळत होते तेव्हा तिच्या समस्यांचे आणि प्रश्नांची संख्याही मर्यादित होती. जेव्हा स्त्रिया शिकल्या त्यांनी उच्च शिक्षण घेतले व आपल्या कार्यक्षेत्राच्या कक्षा रुंदावल्या तेव्हा मात्र त्यांच्या समस्यांनी वेगळे स्वरूप धरण केले. जेव्हा आपण प्रमुख्याने नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करतो तेव्हा त्यांचे वर्गीकरण दोन प्रकारांत करता येऊ शकते, ग्रामीण व शहरी समुदायात वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या स्त्रिया. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या सतत वाढत आहे. शहरी भागात काम करणाऱ्या महिलांचे प्रश्न वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत. ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या या शहरी भागात नोकरी करणाऱ्या समस्या महिलांच्या समस्या गंभीर स्वरूपात आहेत.

**नागरी भागात नोकरी करणाऱ्या महिलांचे समस्या:** नागरी भागात नोकरी करणारी महिला या स्वतंत्र आहेत.नोकरी करणारी स्त्री ही चूल आणि मूल या पासून खूप दूर गेलेली आहे. चार भिंतीच्या आत तिचे विश्व नाही हे सत्य असले तरी नोकरी स्वीकारल्यामुळे तिच्यासमोर आणि प्रश्न निर्माण झाले आहेत. शहरात नोकरी करणाऱ्या स्त्रियांना निवासाची उत्तम व्यवस्था, स्थिती. नोकरीचे कार्यालय व घर यांच्यातील अंतर जास्त असते .दररोज दहा ते पंधरा किलोमीटरचा प्रवास करावा लागतो,परिणामी त्यांचे जीवन धकाधकीचे पण ते शहरात नोकरी करणारी पती-पत्नीची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बराच वेळा एकाच कार्यालयात पती-पत्नी कार्यरत नसतात त्या दोघांच्या कार्यालयातील अंतर जास्त असल्याने यातून अनेक कौटुंबिक समस्या निर्माण होतात. शहरात नोकरी करणारी स्त्री ही अबला नसून सबला आहे ,असे असले तरी त्यांच्या संरक्षणाची नितांत गरज भासत आहे. भारतीय समाजव्यवस्थेत कधी स्त्रियांना प्रोत्साहित केले जाते तर कधी नोकरी करणाऱ्या स्त्रियांना समाजात अवहेलना सहन करावी लागते. शहरात नोकरी करणाऱ्या महिलांना कुटुंबातील मुलांना अन्य सदस्यांना पूर्ण वेळ देऊ शकत नाहीत, परिणामी कुटुंबात पती-पत्नीच्या संबंधात बेबनाव निर्माण होऊ शकतो .एखाद्या कळसूत्री बाहुली प्रमाणे नोकरी करणाऱ्या महिलांची कुटुंबात आणि कार्यालयात अवस्था होते. मध्यमवर्गीय नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे जीवन गतिमान असल्यामुळे वेळ व काम यांचे गणित मांडणे त्यांना शक्य होत नाही. या धकाधकीच्या जीवनात सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करताना या महिलांची धांदल उडत असते. कुटुंबाला आर्थिक मदत म्हणून अनेक मध्यमवर्गीय स्त्रिया नोकरी करतात पण कधीकधी नोकरीची वेतन कमी आणि मानसिक त्रास जास्त असतात अशी अवस्था निर्माण होते व त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. याबरोबरच समाजातील व कार्यालयातील स्त्री-पुरुषां बरोबर येणारे चांगले-वाईट अनुभव याचासुद्धा स्त्रियांच्या मानसिकतेवर परिणाम होतो .एकंदरीत नागरी भागात नोकरी करणाऱ्या महिला पाहता त्यांच्या जास्तीत जास्त वेळ घराबाहेर जातो कार्यालयात खूप अंतरावर असल्यामुळे मुलांना नातेवाईकांकडे पाळणाघरात किंवा नोकरांकडे ठेवावे लागते. ग्रामीण आणि शहरी भागात नोकरी करणाऱ्या महिला व त्यांच्या प्रश्नांची निश्चितच तिव्रति जाणवते.

आज स्त्रियांची स्थिती पूर्वीपेक्षा निश्चित सुधारलेली असली तरीही ती पूर्णपणे बदललेली आहे असे म्हणता येत नाही. आजही स्त्रिया अशिक्षित, पडदा पद्धती,हुंड्या सारख्या प्रथेला बळी पडत आहेत. ग्रामीण भागात महीलांची स्थिती वाईटच आहे. पारंपारिक विचारांचे पाईक असणारे आजही स्त्रीला पायाची





वाहन पायीच बरी असे विचारही व्यक्त करून दाखवले जातात. अनेक सर्वसामान्य कुटुंबात एखाद्या कळसूत्री बाहुली प्रमाणे स्त्रिला नाचवली जाते.

**ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या** - आधुनिक समाज व्यवस्थेत स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे, त्यांच्या दर्जाच्या अधिकारात वाढ झाली आहे . मुलांचे पालनपोषण करणे आणि घरकाम करणे हेच त्यांचे कार्यक्षेत्र न राहता ते विस्तृत होत आहे. घराबाहेर पडून ग्रामीण महिला नवनवीन उद्योग, कुटिरोद्योग, चालवत आहेत. त्यांना शासनाकडून अतिशय अल्प दरात कर्ज पुरवठा केला जात आहे. स्त्रियांच्या जीवनात संजीवनी देण्याचे काम बचत गटाने केले आहे. ग्रामीण भागातील मुली महिला ग्रामीण भागात , शहरात, महानगरात विविध खाजगी शासकीय, निमशासकीय कार्यालयात कार्यरत आहेत.

ग्रामीण स्त्रियांच्या जीवनात होणारे परिवर्तनाची मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचा प्रसार. सर्वसामान्यांचा आर्थिक विकास ,शहराशी वाढते दळणवळण व संबंध आणि ग्रामीण समाजात झपाट्याने पसरत जाणारे सामाजिक आणि राजकीय नेतृत्व हे होय. परंपरेने स्त्रीयां वरजी बंधने लादली आहे ते नाहीशी व्हावीत, आणि स्त्रियांना समाजात व घरात पुरुषाबरोबर समान दर्जा मिळावा ही कल्पना समाजातील सर्वजणांनी करावी हे मान्य झाले आहे, घटनेने स्त्रियांना पुरुषांबरोबर दिलेले समानहक्क हेही स्त्रीच्या दृष्टीने वरदानच ठरले आहेत.

ग्रामीण भागात संस्थांतर्गत परिवर्तने झाली असली तरीही ग्रामीण भागात पारंपरिक विचारसरणी ही पूर्णपणे संपुष्टात आलेली नाही, बहुसंख्य वडीलधारी मंडळी परिवर्तनाच्या विरोधात आहेत. महिलांनी शिकावे, नोकरी करावी, आधुनिक पद्धतीने घरात आणि गावात वावरावे,आपली मते मांडावी यांचा ते विरोध करत असतात. अनेक महिला वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. महानगरात, नगरात, गावात विविध कार्यालयात त्या समर्थ पने नोकऱ्या करतात, अर्थार्जन करतात, घराला हातभार लावतात, परिणाम स्त्रियांच्या घरात, कार्यालयात, गावात असणाऱ्या दर्जा उंचावला आहे, असे असले तरीही .

**ग्रामीण भागात दोन विचारसरणी प्रभावीपणे जाणवतात**

१. स्त्रियांनी शिकावे नोकरी करावी अर्थार्जन करावे स्वतःच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावावा या सारख्या विचारांनी प्रोत्साहित करणारी नवीन पिढी आज ग्रामीण भागात आहे. परिणामी आज मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढत आहे. महिला सुद्धा स्वतःच्या पायावर उभी राहिल्या पाहिजेत या विचाराचा प्रभाव ग्रामीण महिला व मुलीवर पडत आहे,

म्हणूनच ग्रामपातळीवरील शिक्षण संपल्यावर तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी मुलींना शिक्षणासाठी पाठवले जात आहे.

२ पारंपरिक विचाराचा प्रभाव असणाऱ्या ग्रामस्थांचा महिला शिक्षणाला कडाडून विरोध होता. शिक्षण घेऊन काय करायचे हा त्यांचा प्रश्न असतो. स्त्रियांनी फक्त घर सांभाळायची यांचेते समर्थन करतात. मुलींनी शिक्षण घेऊ नये, नोकरी करू नये कारण की शिक्षणामुळे मुली बिघडतात, त्यांना वाईट वळण लागते. कोणत्याही गोष्टीचा त्या विरोध करतात. अशी पारंपरिक मानसिकता आजही आहे.

एकूण पाहता नोकरी करणारी स्त्री ही स्त्रीची नवीन प्रतिमा ग्रामीण भागात आज पसंत केली जात आहे. या मागच्या महत्वाचा उद्देश म्हणजे शिक्षणामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावतो. कुटुंबाचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावतो असे असले तरी नोकरी करणाऱ्या स्त्रियांची सर्व प्रकारच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. नोकरी करते म्हणून कुटुंबाकडे जर दुर्लक्ष झाले तर हे मान्य केले जात नाही. याचा प्रत्यय प्रत्येक नोकरदार महिलांना नित्याने येतो. महानगरात, नगरात ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रश्न, समस्या, समस्यांचे स्वरूप यात भिन्नता आहे .

ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या महिलांवर कार्यालयीन कामकाजाची जबाबदारी असते, पण याबरोबरच ग्रामीण भागातील सर्व स्तरातील महिलांच्या परिवर्तनासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न करावे लागतात. अज्ञानी, अशिक्षित अंधश्रद्धा व पारंपारिक मनोवृत्तीचा पगडा त्यांच्यावर असल्यामुळे या विचारसरणीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी वैज्ञानिक व वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारून त्यांना समाज प्रवाहात आणणे. अंधश्रद्धा ,बुवाबाजीच्या मागे असणारी वास्तविकता काय आहे याची जाणीव करून देण्याची जबाबदारी सुद्धा या महिला कर्मचाऱ्यांवर येते. ग्रामीण भागातील संस्थात्मक बदलाच्या माध्यमाद्वारे सुरू झालेल्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला मदत करण्याचे काम ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचारी करतात. महिला उपलब्ध क्षेत्रात प्राप्त संधींचा फायदा घेत आहेत.

ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या महिलांना अडचणींचा सामना करावा लागतो त्याची यादी फार मोठी आहे. यातील गंभीर समस्या म्हणजे निवासाची सोय तर ग्रामीण लोकज्या घरात वास्तव्य करतात तेथे नोकरीच्या निमित्ताने जाणाऱ्या महिला त्या गावात राहण्यासाठी आवश्यक त्या सुविधा असणारी निवासाची व्यवस्था नसते, म्हणजे निवासाच्या गैरसोयीचा प्रश्न उभा असतो. त्यामुळे त्यांना उपलब्ध असलेल्या सेवा-सुविधांचा स्वीकार करावा लागतो, ही





एक फार मोठी गैरसोय होय. तसेच ग्रामीण लोकांचे सहकार्य त्यांना अत्यावश्यक असते. कारण या महिला कर्मचारी शासनाच्या आदेशानुसार व ग्रामस्थांच्या सोयीसाठी त्या गावात नोकरीसाठी आलेल्या असतात, म्हणून त्यांना पालकांच्या सहकार्याची आवश्यकता असते. त्यांच्या सहकार्याशिवाय त्या महिला कर्मचारी त्यांना नेमून दिलेले काम करू शकत नाहीत, त्यांना दिलेले काम व्यवस्थितरित्या वेळेच्या आत पूर्ण करण्यास असमर्थ ठरू शकतात.

आज महत्त्वाची मानली जाणारी समस्या म्हणजे त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची समस्या व त्यामुळे महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. काही गावात फक्त प्राथमिक शिक्षण उपलब्ध असते व पुढील शिक्षणासाठी शेजारील गावात जावे लागते. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाचा प्रश्न त्यांना सतावतो व त्यासाठी त्यांना पर्यायी व्यवस्था करावी लागते. ग्रामीण भागात शाळा असूनही त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नसतात. स्पर्धेच्या युगात आपली मुले टिकतील की नाही ही शंका त्यांच्या मनात निर्माण होते. मुलांच्या भवितव्याचा यक्षप्रश्न आज असंख्य नोकरदार महिलांना सतावतो आहे ,त्यासाठी पर्यायी व्यवस्था निवडतात, ती म्हणजे जवळच्या गावात राहणे मुलांना हॉस्टेलला ठेवणे, नातेवाईकांकडे ठेवणे अशा प्रकारचा मधला मार्ग काढावा लागतो. संबंधित महिला ग्रामीण भागात नोकरी करतात.

नोकरी करणाऱ्या महिलांना ज्याप्रमाणे निवासाचा प्रश्न सतावतो, त्याचप्रमाणे स्वतःच्या राहणीमान उंचावण्यासाठी तशा प्रकारचे राहणीमान ग्रामीण भागात ठेऊ शकत नाहीत कारण की या भागातील नागरिकांची प्राचीन विचारसरणी आणि मानसिकता यासारख्या मूलभूत अडचणी त्यांच्यासमोर उभे राहतात. नोकरदार महिलांचे शिक्षण शहरात झाल्यामुळे त्यांचे कार्यालय कार्यालय कधीकधी त्या शहरात बदली करून घेण्यासाठी प्रयत्न करतांना आढळतात.

आज भेडसावणारी समस्या म्हणजे स्थानिक राजकारणी गावाची पुढारी नेते मंडळी राजकीय दबावाचा वापर करून आजही राजकारणी लोक नोकरीनिमित्त गावात येणाऱ्या कर्मचारी महिलांना त्रास देतात, या त्रासाचे स्वरूप म्हणजे धमकावणे, शरीरिक मानसिक त्रास देणे इत्यादी. अशा गावांमध्ये बहुतांश वेळा कर्मचारी महिलांना कठीण होत. काही रिकामटेकडी तरुण मंडळी, ग्रामस्थांकडून महिलांची मानहानी केली जाते. कधी कधी तर हा त्रास टोकाला गेल्यावर त्या महिला स्वतःची जीवनयात्रा संपवावी लागते. पारंपरिक विचाराचा पुरस्कार करणाऱ्या, अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणाऱ्या, ग्रामस्थांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन घेऊन वावरावे लागते.

अशा महिलांना जागृत करण्यासाठी या महिला पुढाकार घेतात, पण बऱ्याच वेळा त्यांना ग्रामीण महिलांकडून या कामात मदत मिळत नाही.समाज जागृती करण्यासाठी पुढे सरसावणारे कर्मचारी महिला प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्या जबाबदारी त्या सामाजिक जाणीवेबद्दल निष्क्रिय बनतात.

कार्यालयात जाणारी नोकरदार महिलांना घरकाम आणि कार्यालयातीलकाम यांच्यात समेट घालण्यासाठी घर कामातून काहीअंशी सुटका मिळविण्यासाठी घर काम करणारे नोकर, महीला उपलब्ध होत नाहीत, म्हणून कार्यालय व घराची जबाबदारी त्यांना सांभाळावी लागते. या दोन्ही जबाबदाऱ्या पूर्ण करताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते त्यांना गृहिणीची व पदाधिकाऱ्यांची अशा दोन्ही भूमिका पूर्ण करावे लागतात. घरकाम आणि कार्यालयीन काम यामुळे स्वतःच्या मुलांना कुटुंबियांना त्या हवा तेवढा वेळ देऊ शकत नाहीत आणि यापुढे जाऊन सदरील महिलांचे कुटुंबीय व पती जर संशय वृत्तीचे असतील तर त्या महिला वेगवेगळ्याच मानसिक तणावाखाली वावरतात. ग्रामीण भागात नोकरी करणाऱ्या महिलांना पदोपदी वेगवेगळ्या कौटुंबिक कार्यालयीन मानसिक, सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो. या सर्व अडचणी मधून कर्मचारी महिला आपले कौटुंबिक कर्तव्ये व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पूर्ण करतात ही वाखाणण्याजोगी गोष्ट आहे.

आजच्या समाजातील स्त्रिया घराबाहेर पडून अर्थार्जन करत असून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत. स्त्री अर्थार्जन करत असताना कौटुंबिक जबाबदारी देखील पार पाडते,या जबाबदारीपासून त्याची सुटका नसते यामुळे स्त्रीला कुटुंबातील पुरुषांपेक्षा मानसिक आणि शारीरिक त्रास अधिक असतो, म्हणून तिला शारीरिक आणि मानसिक थकवा जाणवतो. शरीरातील रक्त कमी होते आणि रक्तस्त्राव वाढणे पाठ आणि कंबर दुखणे असे विविध आजार होतात. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या महत्वकांक्षा अधिक असतात नोकरी तिला बढती मिळाली असेल तर तिच्या महत्वकांक्षा वाढतात. त्यामुळे वरिष्ठ लोक ते सहन करत नाही त्यामुळे तिची मानसिकता कोंडी होते आणि तणाव निर्माण होतो.

**उपाययोजना -**

१. नोकरी करणाऱ्या महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांना नोकरीत प्राधान्य द्यावे व त्यांना संधी उपलब्ध करून द्यावी.

२. कामकाजी महिला जर आपल्या नोकरीत चांगले कार्य करत असतील तर शासनाने आणि समाजाने त्यांचा गौरव करावा यातून त्या महिलांना प्रेरणा मिळेल.





३. नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या कुटुंबीयांनी घर कामात सहकार्य करावे. जेणेकरून त्यांना ताणतणाव भासणार नाही

४. नोकरीच्या ठिकाणी त्यांना निवासासाठी निवासासाठी कॉटर्स उपलब्ध करून द्यावेत.

५. नोकरी करणाऱ्या महिलांना कायद्याने आणि समाजाने संरक्षण द्यावे.

६. कार्यालयीन वातावरण महिलांना सुरक्षा प्रदान करणारे असावे यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावेत

**सारांश** - महिलांना सक्षम करून आपण समाज आणि देशाला बलवान करू शकतो. नोकरी करणाऱ्या महिलांना ज्या समस्या असतात त्यांची संख्या कमी करून त्यांना संरक्षण देऊन त्यांच्या क्षमता संवर्धनासाठी, आत्मविश्वास वाढवा यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे.स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणेही आवश्यक आहे. विसाव्या शतकात आधुनिक समाजातील स्त्रियांकडे निखळ दृष्टीने पाहायला हवे, आणि असा समाज निर्माण करण्याची जबाबदारी पुरुष आणि स्त्री दोघांचीही आहे समाजाने स्त्रीकडे पाहण्याची आपली मानसिकता बदलायला हवी. स्त्रियांना शिक्षित करूण स्वतःच्या पायावर उभे केले तर या माध्यमातून आपले राष्ट्र विकसित राष्ट्र बनेल यात शंका नाही.

**संदर्भः**


1. Www.wsc.sgbulib.org
2. Chloronicle of humanities and cultural studies peer reviewed bi monthly international journal December 2018 special issue problems and challenges before the working women editor Dr Vasant Satpute,Dr Sunita Tengse,Dr PPatil,Dec 2018.

३. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या प्राचार्य डॉ दा धो काचोळे, कैलास पब्लिकेशन प्रथम आवृत्ती २००५.

४. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या प्रा डॉ डी एस मनवर, अरुण प्रकाशन प्रथम आवृत्ती २००३.

५. विकासाच्या प्रक्रियेतील स्त्री प्रश्न, सुगता मोहंती, अनुवाद पेंढारकर जोशी, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ मार्च १९९९.


❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani